ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २४ डिसेंबर, १९५८ | अंक ४७

## विविध माहिती

**संरक्षण खात्यानें केलेली बचत**—भारताच्या संरक्षण खात्यानें चालू वर्षाच्या ता. १ एप्रिल पासून सप्टेंबर अखेरपर्यंत ५५ लाख रुपयांची बचत आपल्या खर्चांत केली आहे, अशी माहिती राज्यसभेंत देण्यांत आली. खात्याला लागणाऱ्या सामुग्रीच्या साठ्यांच्या खर्चांतच ३७·८६ लाख रुपयांची बचत करण्यांत आली. पाकिस्तानबरोबर कटकटी चालू असतांहि ही बचत करण्यांत आली आहे.

**दूर चित्रवाणी केंद्र**—दिल्ली येथें उभारण्यांत यावयाचें प्रायोगिक दूर चित्रवाणी केंद्र पुढील आर्थिक वर्षाच्या आरंभापासून काम करूं लागेल असा अंदाज आहे. केंद्रासाठी लागणारी बहुतेक यंत्रसामुग्री आतां आली असून ती आकाशवाणी भवनाच्या इमारतींत उभारण्यांत आली आहे. चांचणी-कार्यक्रमहि चालू आहेत.

**मध्यवर्ती यांत्रिक नांगर संघटना**—सरकारच्या मध्यवर्ती यंत्रचालित नांगरसंघटनेचें कार्य चालूं ठेवणें अवघड होत चाललें आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें नवीन नांगर आयात करणें कठीण होत चाललें आहे. आहेत ते नांगर १२,५०० तास वापरून झाले असल्यानें आतां अधिक वापरण्यालायक राहिलेले नाहींत.

**दंतवैद्यकाचीं कॉलजें**—मध्यवर्ती सरकारनें अमृतसर येथील दंतवैद्यकाच्या कॉलेजाचा विस्तार करण्यासाठी आणि त्रिवेंद्रम् येथें एक नवें कॉलेज काढण्यासाठी आर्थिक मदत देण्याची तयारी दाखविली आहे. दोन्ही कॉलेजांसंबंधीं त्या त्या राज्याच्या सरकारकडून योजना मागविण्यांत आल्या आहेत. संकल्पित मदत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या मुदतींतच दिली जाईल.

**साखरेच्या धंद्याचें वेतन-मंडळ**—साखरेच्या धंद्यासंबंधीं नेमण्यांत आलेल्या मध्यवर्ती वेतन-मंडळाच्या बैठकी पुढील महिन्यापासून भरूं लागतील. भारतांत सध्यां १५८ साखर कारखाने असून ह्या वर्षी आणखी १५ कारखाने चालू होतील. धंद्यांत १॥ लाख कामगार कायम् रोजगारींत आहेत व ५ लाख हंगामांत कामावर घेतले जातात.

**दाढीच्या पात्यांची निर्यात**—हिंदमध्यें तयार करण्यांत आलेलीं दाढीचीं पातीं पश्चिम आशिआंत व पूर्वआफ्रिकेंत निर्यात करण्यांत येत आहेत. त्यांना बाजारपेठहि चांगली मिळत आहे. कलकत्ता व मुंबई येथील तीन कारखान्यांतून दरमहा जवळजवळ २॥ कोटि पातीं तयार होतात. त्यांपैकी २५ टक्के उत्पादन पाकिस्तान, सिंगापूर, मलाया, अफगाणिस्थान, केनिआ, इथिओपिआ, ह्या देशांना निर्यात करण्यांत येतें.

**हिंवतापाच्या रोगाचें उच्चाटन**—जागतिक आरोग्य-संघटनेनें हिंवतापाच्या रोगाचें उच्चाटन करण्यासाठी सर्व जगभर मोहीम चालविली आहे. मोहिमेचा कालावधी १० वर्षांचा असून ह्या कामावर ५ कोटि डॉलर्स खर्च करण्यांत येणार आहेत. राजकुमारी अमृत कौर निरनिराळ्या देशांकडून वर्गणी गोळा करीत आहेत.

**खंबायतच्या आखातांतील तेल**—खंबायतच्या आखातामधील तेलाचें संशोधन अद्याप चालूंच आहे. लनेजच्या आसपास खोदण्यांत आलेल्या विहिरीवरून असें दिसून आलें आहे कीं जमिनीच्या पोटांत निरनिराळ्या पातळीवर तेलमिश्रित वाळूचे थर आहेत व त्यांची जाडी सुमारें २०० फूट आहे. आणखी १५–१६ महिन्यांच्या अवधींत तेथील तेलाच्या सांठ्याचा अंदाज लागूं शकेल.

**अमेरिकेची नवी अणुभट्टी**—अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाविषयीं जिनीव्हा येथें दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यांत आली होती. त्यावेळीं अमेरिकेनें आपली अद्यावत् पद्धतीची अणुभट्टी तेथील प्रदर्शनांत ठेवली होती. ह्या अणुभट्टीचें वजन अवघें १८ टन आहे. प्रदर्शनानंतर ती एखाद्या विद्यापीठाला अगर संशोधन संस्थेला विकण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानचा पोलादाचा कारखाना**—पाकिस्तानच्या सरकारनें मुलतान येथें उभारण्यांत यावयाच्या कारखान्याचें पुढील काम बंद ठेवण्याचा हुकूम क्रुप कंपनीला दिला आहे असें समजतें. नव्या सरकारचें धोरण आणखी औद्योगीकरणाला प्रतिकूल आहे असें म्हणतात. मुलतानचा संकल्पित कारखाना दरसाल ६०,००० टन पोलाद उत्पन्न करणारा होणार होता.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### दि फलटण शुगर वर्क्स लि.

वरील कंपनीला ३० सप्टेंबर, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी १०.०२ लक्ष रु. नफा झाला. पूर्वीच्या वर्षांच्या मानानें साखरेचा खप वाढला, तो १.३७ कोटि रुपयांवरून १.६९ कोटि रुपयांवर गेला. १,२९,३२५ टन ऊंस गाळून १,५७,१५१ पोतीं साखर तयार करण्यांत आली. साखरेचा उतारा १२.२३% पडला. वर्षांतील एकूण उत्पादनाच्या २७.९% साखर कारखान्यांतील गुदामांत विक्रीच्या परवान्याची वाट पहात आहे.

---

### निर्यात वाढीसाठी अधिक कर्जे देण्याची सोय

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें अलीकडेच आपल्या बिल मार्केट योजनेखाली एक्सपोर्ट बिलेंहि आणलीं असल्याचें मध्यवर्ती व्यापारमंत्री श्री. नित्यानंद कानुन्गो यांनीं राज्यसभेंत श्री. एम्. वलिउल्ला यांच्या प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें. यामुळें व्यापारी बँकांना निर्यातदारांस अधिक कर्जे देतां येतील असें सांगून या उपाययोजनेमुळें निर्यातींत वाढ होण्यास किती मदत होईल त्याचें निश्चित मूल्यमापन करणें शक्य नाहीं, असें ते पुढें म्हणाले.

---

### रिझर्व्ह बँकेनें १२६ बँकिंग कंपन्यांना परवाने नाकारले

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें १९५२ ते २० नोव्हेंबर १९५८ पर्यंत एकूण १३ राज्यांतील १२६ बँकिंग कंपन्यांना परवाने नाकारले असल्याचें मध्यवर्ती अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं लोकसभेंत श्री. हेमराज यांच्या प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें. हे परवाने नाकारलेल्या बँकांचीं नांवें व तारखां-संबंधीं ना. मंत्र्यांनीं सभागृहास एक निवेदन सादर केलें. यांपैकी कोठल्याहि बँकेविरुद्ध खटला भरण्याची रिझर्व्ह बँकेला वेळ आली नसल्याची माहिती त्यांनीं पुढें दिली.

---

### बॉंबे गॅस कंपनीच्या गॅसला वाढती मागणी

बॉंबे गॅस कंपनीनें १९४६ मध्यें जेवढा गॅस तयार केला, त्या-पेक्षा ४१.७% ज्यास्त गॅस १९४७ मध्यें निर्माण केला. १९५८ च्या ऑक्टोबर अखेर कंपनीचें उत्पादन १,३७,४६,८३,००० घनफूट एवढें झालें. १९५७ च्या तत्सम मुदतीमधील उत्पादना-पेक्षा तें ५.२% अधिक भरलें. १९५७ मध्यें ७५० नवीं गॅस कनेक्शनें देण्यांत आलीं. गॅससाठी १३,१०६ अर्जदारांचे अर्ज अजून पडून आहेत. गॅसचा खप वाढत आहे आणि नवीं कनेक्शनें मागणारे अर्ज दररोज येत आहेत.

---

### चिनी सुगंधित कापडाची हॉंगकॉंगमध्यें लोकप्रियता

हॉंगकॉंग येथील दुकानांत चीनमधून सुगंधी कापड विक्रीसाठी येऊं लागलें आहे. ह्या रंगीबेरंगी कपास कापडाचा सुगंध थंड पाण्यांत तें कापड पांच वेळां धुतलें जाईपर्यंत टिकतो. हें कापड तेथें अत्यंत लोकप्रिय झालें आहे.

---

### युनायटेड नेशन्सचें अंदाजपत्रक

युनायटेड नेशन्सच्या १९५९ मधील खर्चासाठी ६,०७,५८,६२० डॉलर्सच्या अंदाजपत्रकाची बजेटरी कमिटीनें जनरल असेंब्लीला शिफारस केली आहे.

---


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७०,००,०००चे वर |

बँकेचे इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. वा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २४ डिसेंबर, १९५८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकसंख्या कारणीं लावण्याची सूचना

केरळचे मुख्य मंत्री श्री. नंबुद्रीपाद ह्यांनीं अखिल भारतीय कारखानदार–संघटनेच्या मध्यवर्ती समितीच्या तिसऱ्या तिमाही बैठकीचें अर्णाकुलम येथें उद्घाटन केलें. त्याप्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, हिंदमधील लोकसंख्या अफाट आहे. तिच्या श्रमशक्तीचा उपयोग करून घेतला तर देशाची प्रगति हल्लींपेक्षा खूपच झपाट्यानें होऊं शकेल. द्रव्यविषयक पुरवठ्यावर आणि परकीय चलनाच्या टंचाईवर वाजवीपेक्षा अधिक भर देण्यांत येऊं नये. ह्या बाबतींत चीनचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. चीननें आपल्या लोकसंख्येची श्रमशक्ति कारणीं लावली आहे. कांहीं वर्षांपूर्वीं चीन हा एक अत्यंत मागासलेला देश होता आणि भारताप्रमाणेंच त्याची लोकसंख्या भारभूत झालेली होती. पण ह्याच लोकसंख्येचा उपयोग करून घेऊन चीननें झपाट्यानें प्रगति केली आहे. प्रत्येक खेड्याला तेथील शेतीचा आधार लाभेल आणि आधुनिक पद्धतीचे छोटे कारखाने निघतील अशा प्रकारची कार्यपद्धति आपण शोधून काढली पाहिजे. त्याचप्रमाणें, मोठें व मध्यम प्रतीचे उद्योगधंदे ह्यांची स्थापना करून त्यांची शेतीच्या उत्पादनाशीं जुळणी करण्यांत आली पाहिजे. कांहीं वर्षांपूर्वीं चीनचें पोलादाचें उत्पादन भारताच्या मानानें कमी होतें. पण आतां तें भारताच्या दुप्पट झालें आहे. राष्ट्रीय रचनेच्या कामासाठी लोकांचें सहकार्य पाहिजे असेल तर शेतकऱ्याला व कामगाराला सुरक्षिततेचा व निश्चिंतपणाचा लाभ करून दिला पाहिजे. चीनचें सरकार ही गोष्ट करूं शकलें म्हणूनच चीनची विलक्षण प्रगति झालेली दिसत आहे. ह्याचा अर्थ, चीनमध्यें जें शक्य झालें तें भारतांत शक्य आहे असाच नाहीं. पण लोकांच्या उत्साहाला भरती आणण्याची बाब कोणत्याच प्रगति इच्छिणाऱ्या देशाला डावलून चालणार नाहीं.

## रबराची वाढती मागणी पुरविण्याचे यत्न

भारतामधील रबराच्या कारखान्यांना पुरेल इतकें रबर देशांत निर्माण केलें जात नाहीं. रबरांच्या मळ्यांचें दर एकरीं उत्पादन वाढविण्यासाठी मळेवाल्यांच्या संघटनेकडून प्रयत्न करण्यांत येत आहेत. कृत्रिम रबर उत्पादन करण्यास सुरवात झाली तरी सुद्धां नैसर्गिक रबराची मागणी कमी होण्याची भीति नाहीं असा मळेवाल्यांच्या संघटनेचा अंदाज आहे. चालू वर्षीं भारताच्या रबराच्या खपांत ३,००० टन वाढ होईल असा त्यांचा अंदाज आहे. भारतानें ह्या वर्षीं ३,००० टन कृत्रिम रबर आणि ८,८६८ टन नैसर्गिक रबर आयात केलें ह्यावरून केरळमधील रबराचें उत्पादन वाढविण्याची गरज स्पष्ट होत आहे. रबराचा वापर करून त्याच्या निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू तयार करणाऱ्या कारखान्यांकडून रबराचें उत्पादन वाढविण्यासाठी मळेवाल्यांना मदत करण्यांत येत आहे. भारताच्या आसपासच्या देशांना रबराच्या वस्तू निर्यात करण्याची वाढती शक्यताहि आहे. देशांतील मोटारींची संख्या वाढल्यामुळें त्यांना लागणाऱ्या टायर्स व ट्यूब्स ह्यांचें उत्पादनहि वाढलें आहे. १९६१ सालच्या सुमारास गिरण्यांतून वापरण्यांत येणारे पट्टे, रबरी नळ्या, पायतणे, ह्यांचें उत्पादनहि बऱ्याच प्रमाणांत वाढण्याचा संभव आहे. केरळमध्यें टायर्स तयार करण्याचा एक नवा कारखाना काढण्यांत येत असल्यामुळें रबराची मागणी आणखीनच वाढणार आहे. भारतामधील रबराची किंमत बरीच चढी ठेवण्यांत आलेली असतांना सुद्धां टायर्सच्या कारखान्यांनीं अधिक रबराचा वापर केला व आपली उत्पादनक्षमता वाढविली; तथापि रबरावर बसविलेले कर आणि कामगारविषयक कायदे ह्यांचा जांच कमी झाला पाहिजे, अशी मागणी करण्यांत येत आहे.

## करांच्या ओझ्यामुळें विपरीत परिणाम

मद्रास राज्यांतील मैयलापूर येथील विवेकानंद कॉलेजांत 'भारताची आर्थिक स्थिति' ह्या विषयावर परिसंवाद घडवून आणण्यांत आला होता. ह्या परिसंवादांत भाषण करतांना प्रो. वासुदेवन् ह्यांनीं पुढील आशयाचे विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, आर्थिक धोरणें ठरवितांना सर्वमान्य तत्त्वांचा आधार घेण्यांत आला पाहिजे. राजकीय मतप्रणाली आणि आर्थिक तत्त्वें ह्यांची गल्लत करतां कामा नये. आर्थिक आणि द्रव्यविषयक धोरणाबाबत तर्कशुद्ध विचारांचा विकास १९५१–५२ सालांपासूनच दिसून येतो. तथापि, ह्या काळापासून अंमलांत आणल्या गेलेल्या धोरणांवर पंचवार्षिक कार्यक्रमांचा आणि आर्थिक विषमतेचा विशेष पगडा बसलेला दिसून येतो. करांसंबंधीं बोलावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं त्यांची रचना फार गुंतागुंतीची झाली आणि त्यामुळें उत्पन्नाची बाब म्हणून करांना असणारी बाजू लंगडी झाली. म्हणून गुंतागुंतीची करपद्धति असण्यापेक्षा करांची संख्या बेताची असावी आणि त्यांच्यापासून उत्पन्न मात्र चांगलें व्हावें. देशांत खरी लोकशाही निर्माण व्हावयाची असल्यास भरमसाठ कर ही एक मोठी धोंडच मानली पाहिजे. आज भारतांत खरी लोकशाही निर्माण करण्यांत येत आहे असें सांगण्यांत येतें. पण, वस्तुस्थिति तशी नाहीं. आज भारतांत कर गोळा करणारें राज्य निर्माण झालें आहे. ह्या राज्यांत मध्यमवर्गीय लोक आणि कमी उत्पन्न असणारे लोक ह्यांना निरनिराळ्या प्रकारचे अप्रत्यक्ष कर द्यावे लागत आहेत. सध्यां ज्या प्रकारचें आर्थिक व द्रव्यविषयक धोरण अंमलांत आणण्यांत येत आहे त्यामुळें अधिकाधिक चलनवाढ होत आहे. हें असेंच चालू राहिल्यास, लोकांचा आपल्या वागणुकीवरील ताबा सुटून ते आततायी बनण्याचा संभव आहे.

## भारतांतील पेट्रोलियम उद्योगधंद्यांतील गुंतवणूक

भारतांतील पेट्रोलियम उद्योगधंद्यांत अंदाजें २४५ कोटि रुपये गुंतलेले आहेत. यांपैकी २१४ कोटि रुपये परकीय व ३० कोटि रुपये भारतीय भांडवल आहे.

**प्रवाशांच्या सोयीसाठी राजवाडा—** प्रवाशांची उतरण्याची सोय करण्यासाठी अलवार येथील प्रशस्त राजवाडा अलवारपासून ८ मैलांवर तळयाच्या कांठीं एका टेकडीवर निसर्गरम्य ठिकाणीं आहे. प्रवाशांच्या आरामासाठी राजवाड्यांत आधुनिक पद्धतीचे कांहीं बदल करण्यांत आले आहेत.

**दिल्लीजवळील खेड्यांत उंदीरनाशक मोहीम—** दिल्ली जवळील दोन खेड्यांत उंदरांचा नाश करणारी मोहीम सुरू करण्यांत आली आहे. उंदरांची उत्पत्ति फार झपाट्यानें होते. एका नर–मादीपासून एका वर्षांत २५० उंदीर होतात. देशांत २४० कोटि उंदीर असून ते दरसाल सुमारें २·६ कोटि अन्नधान्याचा फडशा करतात, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**एअर इंडिआ इंटर नॅशनल—** १९५७–५८ सालीं एअर इंडिया इंटर नॅशनल कंपनीच्या हवाई मार्गांवर त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा ८,४०७ अधिक प्रवाशांनीं प्रवास केला. पण कंपनीच्या नफ्यांत मात्र घट झालेली आहे. १९५६–५७ सालीं कंपनीला ८७·९० लाख रुपये नफा झाला होता. १९५७–५८ सालीं नफा ७१·६७ लाख रुपये झाला.

**दुधाच्या भुकटीचा कारखाना—** विजयवाडा येथें दुधाची भुकटी तयार करण्याचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी १५ लाख रुपये भांडवल लागेल. ह्या भागांत अशा प्रकारचे ५ कारखाने निघूं शकतील असा तंत्रज्ञांचा अंदाज आहे. भारत सरकारनें ह्या कामासाठी २ लाखांवर मदत मंजूर केली आहे.

**अन्नधान्याचा सरकारी व्यापार—** तांदुळाच्या चालू हंगामांत सरकारची अन्नधान्याच्या व्यापाराची योजना अंमलांत आणण्यांत येणार नाहीं, अशी वार्ता आहे. सध्यां तरी सरकार फक्त २० लाख टन तांदुळाचा सांठा करून ठेवणार आहे. घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना आपले व्यवहार पूर्वीप्रमाणेंच करतां येतील.

**आशिआंतील राष्ट्रांना मदत—** कैरो येथें भरलेली आशिआ-आफ्रिका देशांची आर्थिक परिषद संपली. परिषदेचें पुढील अधिवेशन पुढील वर्षीं दिल्ली येथें भरविण्यांत येण्याचा संभव आहे. परिषदेला आलेल्या रशिअन व चिनी प्रतिनिधीमंडळानें आशिआ व आफ्रिका खंडांतील देशांना कच्च्या मालाचा व पक्क्या मालाचा पुरवठा करण्याची तयारी दाखविली. मालाची किंमत त्या त्या देशाच्या चलनांत घेण्यांत येणार आहे.

**तेल कारखान्यांबाबत सहकार्य—** खनिज तेलाविषयींच्या इटालिअन तज्ज्ञांचें मंडळ भारतांत आलें आहे. बिहारमध्यें बरौनी येथें तेलशुद्धीचा कारखाना काढण्यासाठी इटलीकडून मदत मिळण्यासंबंधीं त्यांनीं सरकारशीं चर्चा केली. भारतामधील तेलाचे साठे शोधून काढण्यासाठी इटलीची मदत मिळण्याचा संभव आहे.

**पोलादाच्या उत्पादनाचा अभ्यास—** जपान व चीनमधील पोलादाच्या उत्पादनाच्या तांत्रिक व आर्थिक बाजूंचा अभ्यास करण्यासाठी भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ त्या देशांचा चार आठवड्यांचा दौरा करणार आहे. विशेषतः चीनमधील पोलादाच्या उत्पादनाच्या मध्यम प्रतीच्या भट्ट्यांची पहाणी करण्यांत येणार आहे.

**दामोदर नदीच्या खोऱ्यांत पाण्याची टंचाई—** दामोदर नदी–खोरें योजनेनें मूलतः शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचें उद्दिष्ट ठेवलेलें होतें. योजनेंतील धरणामधील पाणी फार मोठ्या प्रमाणावर कारखाने वापरीत आहेत. त्यामुळें उन्हाळ्यांत कारखान्यांना तर पुरेसें पाणी मिळणार नाहींच, पण घरगुती वापरासाठीहि पाणी अपुरें पडण्याचा संभव आहे.


दक्षिण भारतांतील जुनी व नाणावलेली बँक

# दी इंडियन बँक लि., मद्रास

( स्थापना : १५ ऑगस्ट १९०७ )

या बँकेची पुणें शाखा २४८ बुधवार पेठ, पुणें २. ( पुणें नगर वाचन मंदिरासमोर )
दि. १७–११–५८ पासून उघडण्यांत आली आहे.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | १,००,००,००० | रिझर्व फंड व इतर रिझर्व | ६०,४४,५८४ |
| खपलेलें भांडवल | ७२,००,००० | ठेवी | ३८,७०,९६,४१५ |
| वसूल झालेलें भांडवल | ६६,१९,६२५ | रोख्यांतील गुंतवणूक | ९,८५,११,५२३ |
| शेअर प्रीमिअम | ३१,१७,३०० | खेळतें भांडवल | ४६,०५,११,८१२ |

★ बँकेंत चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येऊन बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
★ गेले वर्षी ( १९५७ ) १९% दरानें डिव्हिडंड दिलें आहे.
★ तपशीलवार माहितीकरितां शाखाकचेरींत समक्ष भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

सी. एस्. नागराज रावसाहेब.
एजंट, पुणें शाखा.

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना, लि.

### ३० जून, १९५८ अखेरचा अहवाल

( नवीन सहकारी साखर कारखान्यांची उभारणी करतेवेळीं येणाऱ्या अडचणींची कल्पना यावी व त्यांना भांडवलपुरवठा कसा होतो हें लक्षांत यावें, ह्यासाठी राहुरी सहकारी साखर कारखान्याच्या संबंधीं जरा तपशिलानें माहिती आम्हीं देत आहों. )

ह्या सहकारी साखर कारखान्यामध्यें उसाचें क्षेत्र १००० ते १२०० सभासदांमध्यें विभागलेलें असून इतस्ततः पसरलेलें असतें. त्याकारणानें गळीतास लागणारा रोजचा ऊंसपुरवठा नियमित मिळच्या गरजेप्रमाणें होणें फार कठीण काम आहे. नवीन यंत्रसामुग्रीचे बाबतींत ती सुरळीत चालू होईपर्यंत पुरवठा आणि रूप यांचा मेळ घालणें हें विशेष परिश्रमाचें होऊन बसतें. या सर्व गोष्टींचा विचार करून या कामांत शक्य तितका विस्कळीतपणा येऊ नये म्हणून कांहीं सदस्यांची समिति नेमण्यांत आली होती. समितीच्या सर्व सदस्यांनीं स्वतःचीं अनेकविध कामें बाजूला ठेवून केवळ कारखान्याच्या हिताच्या दृष्टीनें कारखान्याचें संचालन अबाधित ठेवण्यासाठी दैनंदिन प्रशंसनीय काम केलें आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रांत आरंभापासून राहुरी तालुक्यांतील ४३ गांवें आहेत. अहवालाच्या सालांत त्यांच्या संख्येंत कोणताहि फरक झालेला नाहीं. तथापि सुरुवातीस कांहीं सभासद कार्यक्षेत्रालगतच कांहीं परिस्थितीनें घेतले असल्यामुळें कार्यक्षेत्र वाढविणें आवश्यक होऊन त्यासंबंधींची पोटनियम दुरुस्ती करण्यांत आली आहे.

कारखान्याचे कार्यक्षेत्रांतील गांवें साधारणपणें १० मैलांचे परिसरांत आहेत. या गांवांपैकी २१ गांवें प्रवरा राईट बँक कॅनॉलवर असून २२ गांवांचें क्षेत्र विहिरीवर आहे. कॅनॉलवरील व विहिरीवरील उसाचें एकूण क्षेत्र ४,५०० एकर आहे. कामकाजाचे सोईसाठी या सर्व गांवांची विभागणी राहुरी, देवळाली, टाकळी, बेलापूर व कोल्हार अशा पांच विभागांत केलेली आहे.

सन १९५७–५८ सालचे गळीत हंगाम एकूण २९७९–०४ एकर इतक्या उसाचे गळीत झालें. या क्षेत्रांत एकूण १,२५,५९४ टन उसाचें उत्पादन झालें. यावरून दरएकरीं उसाचें सरासरी उत्पादन ४२–१५ टन झालें असल्याचें दिसून येईल.

कारखान्याचे सुरुवातीस तांत्रिक स्वरूपाच्या अनेक अडचणी येऊन गळीत कमी झाल्यानें त्यांतच गाड्यांची संख्या सुरुवातीपासून कमी असल्यानें उसाच्या पुरवठ्यास विशेष ताण पडूं लागला. शेतीच्या कामाच्या ओढीनें गाडीवान परतुं लागले. याउलट मशिनरी रुळून तिची कार्यक्षमता वाढून उसाचें गळीत जास्त होऊं लागलें. या सर्व प्रश्नांचा पुन्हां विचार करून शक्य त्या मार्गांनीं सभासदांचा ठरविलेला ऊंस गळीतास आणणें आवश्यक झालें. त्याकरितां गाडीवानांना परिस्थितीची कल्पना देऊन त्याचप्रमाणें बक्षीसांचें आश्वासन देऊन त्यांना हंगाम संपेपर्यंत राहण्यास प्रवृत्त केलें. तरीहि उसपुरवठा पुरा पडेना म्हणून सभासदांना स्वतः ऊंस पोहोंचता करण्याची विनंती करण्यांत आली. त्याचप्रमाणें मोटारनें वाहतूक करण्याची व्यवस्था करण्यांत आली व परिस्थितीप्रमाणें त्याचे दरहि वाढवून दिले. तसेच ऊंस–तोडणीकरितां बाहेरगांवाहून माणसें मागवून घेतलीं. या सर्व प्रयत्नांना यश येऊन ठरविलेला ऊंस पुरापुरा गाळण्यांत आला.

तसेंच गाडीवानांनीं परिस्थितीची जाणीव ठेवून घरची ओढ बाजूस सारून ऐनप्रसंगीं कारखान्याशीं जें सहकार्य दिलें त्यांचें थोडेबहुत उतराई होता यावें म्हणून जे दि. २३–५–५८ पर्यंत राहिले त्यांना प्रत्येकी रोख रु. २० व जे अखेरपर्यंत राहिलें त्यांना प्रत्येकी रोख रु. ४० याप्रमाणें बक्षिस देण्यांत आलें. तसेंच गाडी कंत्राटदारांना प्रत्येकी १ फेटा व १ उपरणें बक्षिस म्हणून देऊन याखेरीज त्यांना वहातुकीवर शें. ६·२५ इतकें व तोडणीवर शें. ५ याप्रमाणें कमिशन दिलें. सर्वांना जातांना जेवण दिलें.

कारखान्यांत साखर तयार करण्याकरितां लागलेल्या खर्चाचा आढावा घेऊन सभासदांना शेतावर ३९ रु. (एकूणचाळीस रु.) टन प्रमाणें भाव देण्यांत आला. प्रचलित आर्थिक परिस्थितींत सभासदांना हा भाव जरा कमी वाटला तरी कारखान्याचें पहिल्याच हंगामांत यापेक्षा अधिक कांहीं करतां येणें शक्य नव्हतें. इतकेंच नव्हें तर हा भाव कारखान्याचे गळिताचा हिशेब करतां थोडा जास्तच आहे.

दि. ५ मे १९५४ पासून कारखान्याचे उभारणीसाठी चालू असलेले पर्व संपून अहवालसालीं दि. १९–१०–५७ पासून कारखान्यांत साखरेचें उत्पादन प्रथमच सुरू झालें. त्यासंबंधींची उद्बोधक माहिती खालील आंकड्यांवरून मिळेल.

| | |
|---|---|
| १. हंगाम सुरू झाल्याची तारीख | १९–१०–५७ |
| २. हंगाम बंद झाल्याची तारीख | ४—६–५८ |
| ३. हंगामाचे एकूण चालू दिवस | २२९ |
| ४. गळीताचे एकूण दिवस | २२८ |
| ५. उसाचें क्षेत्र | २,९७९ एकर |
| ६. गळीतास आलेला ऊंस | १,२५,५९४ टन |
| ७. उसाचें एकरीं सरासरी उत्पादन | ४२–१५ टन |
| ८. एकूण तयार झालेली साखर (पोर्ती) | १,२७,०४९ |
| ९. „ „ (टन) | १२,८३४ |
| १०. हंगामांतील सरासरी उतारा (रिकव्हरी) | १०·२ |

साखरेची विक्री टेंडर्स घेऊन करण्याची पद्धत स्वीकारली आहे.

कारखान्याने शक्य तितक्या गिऱ्हाईकांना कमी किंमतींत कन्झ्युमर्स अगर सेल–परचेस यांचेमार्फत साखर विकण्याची व्यवस्था केली आहे. कारखान्याचा हा पहिलाच हंगाम असूनसुद्धां मुंबईराज्यांतील ह्यावर्षी नवीनच चालू झालेल्या सहकारी कारखान्यांपैकी ह्या कारखान्यानें १,२७,४०९ पोर्ती साखर उत्पादन केली ही समाधानाची गोष्ट आहे.

### भांडवलाची गुंतवणूक (प्रमुख बाबी)

**साखरउत्पादनाची यंत्रसामुग्री**

| | |
|---|---|
| साखरउत्पादनाची यंत्रसामुग्री | रु. ६५,९२,६५६ |
| कारखाना उभारणी | रु. ९,३३,१६० |
| व्यवस्था खर्च (३१–१०–५७ अखेर) | रु. २,७५,२१७ |
| | रु. ७८,०१,०३३ |
| वजा झीज | रु. ५,६६,००० |
| | रु. ७२,३५,०३३ |
| इमारती | रु. १६,३१,९६४ |
| शिलकी स्टोअर्स | रु. ५,५२,९३३ |
| वजनें व काटे | रु. ८७,८६१ |
| पाणीपुरवठा | रु. ८८,२६३ |
| वीज पुरवठा | रु. १,१०,४५० |
| शिल्लक साखर | रु. ५२,२३,४६८ |

## कारखान्याची भांडवल–उभारणी

| देणें | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| **मागणी केलेलें व वसूल झालेलें भांडवल** | | |
| (१) ३,१९३ साधे भाग, उत्पादक सभासदांकडून प्रत्येक भागामागें रु. ७५० प्रमाणें मागणी केलेले | रु. २३,९४,७५०–०० | |
| वजा वसूल न झालेले ... | रु. ४,७४,६७६–०० | |
| | रु. १९,२०,०७४–०० | |
| अधिक आगाऊ वसूल झालेले ... | रु. २,७७६–०० | १९,२२,८५०–०० |
| (२) ३९ साधे भाग, साधारण सभासदांकडून प्रत्येक भागामागें रु. ७५० प्रमाणें मागणी केलेले | रु. २९,२५०–०० | |
| अधिक आगाऊ वसूल झालेले ... | रु. ९,७५०–०० | ३९,०००–०० |
| (३) १,००० परतफेडीच्या अग्रहक्काचे भाग, प्रत्येकी रु. १,००० प्रमाणें पूर्ण मागणी केलेले व वसूल झालेले, मुंबई सरकारला दिलेले भाग | | १०,००,०००–०० |
| | | २९,६१,८५०–०० |
| **शेअर्स अनामत** ... | | १,९५,२१३–०० |
| **कर्जें** | | |
| (१) इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून द. सा. द. शें. ७ दरानें, मंजूर झालेल्या व १२ वर्षांत परत फेडावयाच्या कारखान्याच्या जिंदगीचे तारणावर ... | | ४३,००,०००–०० |
| (२) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांजकडून द. सा. द शें. ६–५० दरानें सरकारी खातरजमेवर मंजूर झालेल्या व तीन वर्षांत प्रत्येकी रु. २,५०,००० चे हप्त्यानें परत करावयाचें मध्यम मुदतीचें कर्ज | रु. ७,५०,०००–०० | |
| वजा पहिला हप्ता फेडलेला | रु. २,५०,०००–०० | |
| | रु. ५,००,०००–०० | |
| त्यावरील व्याज ता. ३०–६–५८ पर्यंतचे | रु. १७,६६८–५६ | ५,१७,६६८–५६ |
| (३) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांजकडून द. सा. द. शें. ६–५० दरानें सरकारी खातरजमेवर मंजूर झालेलें ... | रु. ७,५०,०००–०० | |
| त्यावरील व्याज ३०–६–५८ पर्यंतचें | रु. २५,५१६–४७ | ७,७५,५१६–४७ |
| (४) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांजकडून द. सा. द. शें. ६–५० दरानें सरकारी खातरजमेवर मंजूर झालेलें ... | रु. ५,००,०००–०० | |
| त्यावरील व्याज ३०–६–५८ पर्यंतचें | रु. १५,९५०–२६ | ५,१५,९५०–२६ |
| (५) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई यांजकडून मेसर्स जी. एच. एच. कं. जर्मनी यांच्या मशिनरीच्या पहिल्या १५ टक्कयांच्या पुढील हप्त्यासाठी द. सा. द. शें. ६–५० दरानें मंजूर झालेले ... | रु. ६,३६,०००–०० | |
| त्यावरील व्याज ३०–६–५८ पर्यंतचें | रु. २०,२७६–३३ | ६,५६,२७६–३३ |
| (६) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., राहुरी मालतारणावर द. सा. द. शें. ६ दरानें मंजूर झालेलें कर्ज ... | रु. ४०,००,०००–०० | |
| पैकीं उचल | रु. ३५,८७,६१६–५९ | |
| अधिक व्याज ३०–६–५८ पर्यंतचें | रु. ६९,७१३–८१ | ३६,५७ ३३०–४० |
| (७) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई तात्पुरती उचल | | ८९,६९५–७२ |
| (८) दि बॉंबे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., शाखा राहुरी, तात्पुरती उचल | | २८,९२८–०४ |
| | | १,०५,४१,३६५–७० |
| **सभासद डिपॉझिट** ... | | ३,४७,२६३–०० |
| **मशिनरी खरेदीबाबत देणें** ... | | ५,२६,६६६–९९ |

**आंध्रकडून धान्याची खरेदी** – केरळ सरकारनें आंध्र राज्याकडून १५,००० टन तांदूळ खरेदी केला आहे. दर पोत्याला ३७॥ रुपये किंमत ठरविण्यांत आली. सर्व तांदूळ राज्याला एक महिन्यांत पुरविण्यांत येईल. ह्यापूर्वी १०,००० टन तांदूळ घेण्याचा सौदा करण्यांत आला आहे. मध्यवर्ती सरकारनें तांदुळाच्या ज्या किंमती ठरवून दिल्या आहेत, त्यापेक्षा केरळनें पोत्यामागें ५ रुपये अधिक देऊं केले आहेत.

**चांदा येथें जंगलाविषयक शाळा**—मुंबई राज्यांत चांदा येथें जंगलविषयक शाळा काढण्यांत आली आहे. राज्यांतील अशा प्रकारची ही तिसरी शाळा आहे. चांदा जिल्ह्यांतील जंगलापासून दरसाल ८१ लाख रुपये उत्पन्न मिळतें. जिल्ह्यांतील शेतसाऱ्याचें उत्पन्न १० लाख रुपयेच आहे. जंगलाचें संवर्धन करण्यांत आल्यास त्यापासून ३ कोटी रुपये उत्पन्न मिळूं शकेल.




तुम्हीं कोणासाठीं
पैसे मिळवितां?...

तुम्हांला वाटतं बायकामुलांसाठीं. पण प्रत्यक्ष काय करतां हें बघितलं काय? पगार झाल्यावर तुम्ही आधीं वाणी, दूधवाला, डॉक्टर, घरवाला, कापडवाला यांची बिलं चुकतीं करतां आणि मग उरलेले पैसे मुलाबाळांसाठीं. उद्यां तुम्ही नसलांत तरी ह्या सर्वांना हें पैसे द्यावे लागणारच. फार तर थोडे कमी, एवढेंच. त्यासाठीं आधीं कांहीं विशिष्ट रक्कम विम्यांत गुंतविलीत तर आपला व कुटुंबाचा भावी काल सुरक्षित होईल.

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया
सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC 6

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] सारस्वत बँक गृह, मुंबई ४ [टेलिफोन २७०९४

२, ५ व १० वर्षें मुदतीचीं
सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें } व्याज ३॥ ते ४॥ टक्के

: बँकेच्या शाखा :
फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४.

## परकीय कंपन्यांतील वरिष्ठ श्रेणीमधील भारतीय नोकर

### १९५८ चा अहवाल

१ जानेवारी, १९५८ रोजीं भारतांतील परकीयांच्या मालकीच्या वा त्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगधंद्यांमधील भारतीयांच्या संख्येची छाननी केली असतां असें दिसून आलें कीं या कंपन्यांमधील १००० रुपये वा त्याहून अधिक पगाराच्या भारतीय नोकरांचें प्रमाण संख्येच्या तसेंच टक्केवारीच्या दृष्टीनें आणखी वाढलें आहे. १८०० रुपये व त्याहून अधिक पगार घेणारे भारतीय व भारतीयेतर यांबाबतची १९४७ पासूनची शेंकडेवारी पुढीलप्रमाणें आहे :—

**१,००० रुपयांवरील पगाराचे नोकर**

| वर्ष | भारतीय | शेंकडा प्रमाण | भारतीयेतर | शेंकडा प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९४७ | ५०४ | ७·९ | ५,८४४ | ९२·१ | ६,३४८ |
| १९४८ | ७४२ | १०·४ | ६,३६० | ८९·६ | ७,१०२ |
| १९४९ | १,०८५ | १३·९ | ६,७०९ | ८६·१ | ७,७९४ |
| १९५० | १,४०६ | १७·० | ६,८७१ | ८३·० | ८,२७७ |
| १९५१ | १,७८४ | २०·४ | ६,९५३ | ७९·६ | ८,७३७ |
| १९५२ | २,२९० | २४·४ | ७,१०४ | ७५·६ | ९,३९४ |
| १९५४ | ३,३४६ | ३२·३ | ७,००८ | ६७·७ | १०,३५४ |
| १९५५ | ३,९९५ | ३७·० | ६,८१० | ६३·० | १०,८०५ |
| १९५६ | ४,६८५ | ४१·६ | ६,५६६ | ५८·४ | ११,२५१ |
| १९५७ | ५,६१४ | ४८·२ | ६,०२५ | ५१·८ | ११,६३९ |
| १९५८ | ६,७०४ | ५४·३ | ५,६५२ | ४५·७ | १२,३५६ |

सर्वच प्रकारच्या कंपन्यांतून भारतीयेतरांचें शेंकडा प्रमाण १९४७ पासून घटत आहे. या उलट, भारतीयांचें प्रमाण १९४७ पासून सतत वाढत आहे. गेल्या ११ वर्षांत भारतीयांची एकूण संख्या तेरापटीहून अधिक वाढली आहे. भारतीयांचें १९४७ मधील ७·९ टक्के व १९५१ मधील २०·४ टक्के हें प्रमाण १९५६ मध्यें वाढून ४१·६ टक्के, १९५७ मध्यें ४८·२ व १९५८ मध्यें ५४·३ टक्के झालें.

### १,००० रुपयांहून अधिक पगाराचे गट

एक हजार ते पंधराशें या पगारगटांत १९५८ मध्यें असलेल्या एकूण जागांच्या ८४·२ टक्के जागांवर भारतीय आहेत. १९५६ व १९५७ मधील हेंच प्रमाण अनुक्रमें ६७·९ व ७७·७ टक्के असें आहे. त्यापुढील म्हणजे १५०१ ते २००० रुपये पगारगटांतील जागांपैकीं ६२·२ टक्के जागांवर भारतीय होते. १९५७ मधील हेंच प्रमाण ५४·२ टक्के होतें. २००१ ते ३००० या पगारगटांत ३६·५ टक्के जागांवर भारतीय काम करीत आहेत. १९५७ मधील हेंच प्रमाण २९·४ टक्के होतें. ३००१ ते ५००० या पगारगटांत हेंच प्रमाण १६·४ टक्के असून १९५७ मधील प्रमाण १२·७ टक्के असें आहे. सर्वांत वरिष्ठ म्हणजे ५००१ व त्याहून अधिक पगारगटांच्या जागांपैकी ६ टक्के जागांवर भारतीय आहेत. त्यामागील वर्षीं हें प्रमाण ५·१ टक्के होतें.

परकीयांच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या फर्म्समध्यें दरमहा १००० रुपये व त्याहून अधिक पगार मिळणाऱ्या जागांवर काम करणाऱ्या १२,३५६ नोकरांचें मासिक पगारपत्रक २·८५ कोटि रु. चें आहे. त्यांपैकी १·०८ कोटि रुपये पगाराची रक्कम भारतीयांना मिळते. एकूण नोकरांत त्यांचें प्रमाण ५४·३ टक्के आहे. भारतीयेतर नोकरांचें प्रमाण ४५·७ टक्के असून त्यांच्या पगाराची रक्कम १·७७ कोटि रुपये आहे. पगाराच्या पांच गटांत भारतीय आणि भारतीयेतर यांच्या पगाराचा एकूण पगाराशीं असलेल्या प्रमाणाचा तक्ता पुढें दिलेला आहे:—

**एकूण पगाराची छाननी**

| पगार गट | भारतीय % | भारतीयेतर % | एकूण % |
|---|---|---|---|
| १००० ते १५०० रुपये | १६·१ | ३·१ | १९·२ |
| १५०१ ते २००० „ | ८·५ | ५·३ | १३·८ |
| २००१ ते ३००० „ | ८·२ | १४·५ | २२·७ |
| ३००१ ते ५००० „ | ४·३ | २२·२ | २६·५ |
| ५००१ रुपये व त्याहून अधिक | ०·९ | १६·९ | १७·८ |
| एकूण ( सर्व पगार गट ) | ३८·० | ६२·० | १००·० |
| | (१०८·४४ लक्ष रु.) | (१७६·९७ लक्ष रु.) | (२८५·४१ लक्ष रु.) |

या तक्त्यावरून ३००१ ते ५००० रु. या पगार गटांचें पगारपत्रक सर्वांत मोठें म्हणजे एकूण पगारपत्रकाच्या २६·५ टक्के असून त्यानंतर २००१ ते ३००० या पगारगटाचा क्रम लागतो. त्याचें हेंच प्रमाण २२·७ टक्के पडतें.

भारतीयेतरांचें १००० रुपये व त्याहून अधिक पगार गटांतील प्रमाण चालू वर्षांत सर्व प्रकारच्या कंपन्यांत घटलें आहे. १९५८ मध्यें कंपन्यांच्या कोणत्याहि गटांत तीन चतुर्थांश किंवा त्याहून अधिक प्रमाणांत परकीय नोकर नव्हते. १९५७ मध्यें फर्म्सचे असे दोन गट होते.

### परकीय नोकरांचें प्रमाण कोठें निम्म्यापेक्षा जास्त आहे ?

१ जानेवारी १९५८ रोजीं पुढील सहा गटांतील कंपन्यांतून परकीय नोकरांचें प्रमाण निम्म्याहून अधिक परंतु तीन-चतुर्थांशाहून कमी होतें. ( १ ) मळे आणि अनुषंगिक कंपन्या ( ७४·४% ). ( २ ) तागाच्या गिरण्या व प्रेसिस ( ७२·९% ) ( ३ ) बँकिंग ( ६८·३% ) ( ४ ) वाहतूक ( ५५·२% ) ( ५ ) इतर खनिजें, बांधकाम साहित्य इ. ( ५३·०% ) आणि ( ६ ) मॅनेजिंग एजन्सी कंपन्या ( ५१·०% ) १ जानेवारी १९५७ रोजीं या प्रकारच्या फर्म्सचे सात गट होते.

### कोठें निम्म्याहून कमी आहे ?

कंपन्यांच्या उरलेल्या पुढील १४ गटांत परकीयांचें शेंकडा प्रमाण निम्म्याहूनहि कमी होतें. ( १ ) इतर एजंट, व्यापारी, जहाजांतून माल पाठविणारे व आणणारे व्यापारी, आयात-निर्यात फर्म ( ४९·२% ), ( २ ) मोटारींचे व्यापारी व उत्पादक ( ४९·१% ), ( ३ ) विमा कपन्या ( ४८·१% ), ( ४ ) साखर व दारु गाळणारे कारखाने ( ४४·०% ) ( ५ ) यंत्रसामुग्री, अवजारें इंजिनिअरिंग इ. ( ४०·९% ), ( ६ ) कापड गिरण्या व प्रेसिस ( ३८% ) ( ७ ) छापखाने, प्रकाशन, स्टेशनरी व अनुषंगिक व्यवसाय ( ३७·१% ), ( ८ ) लोखंड व पोलाद धरून धात ( ३१·७% ), ( ९ ) कोळसा कंपन्या ( ३०·७% ) ( १० ) रसायनें व अनुषंगिक व्यवसाय ( ३०·१% ), ( ११ ) तेल कंपन्या ( २७·७% ), ( १२ ) कातडी, रबर ( व्यापार व उत्पादन ) ( २२·०% ) ( १३ ) सार्वजनिक उपयुक्ततेच्या कंपन्या ( २१·९% ) व ( १४ ) इतर सर्व संकीर्ण कंपन्या ( ४१·३% ).

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.